**<u>ठळक बातम्या</u>**

- ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
- भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणामुळे आसियान देशांमधल्या परस्पर संबंधांना नवी ऊर्जा, गती आणि दिशा मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- नॉन क्रिमिलेयर मर्यादा ८ लाखांवरुन १५ लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय
- सुप्रसिद्ध टेनिसपटू राफेल नदाल याची व्यावसायिक टेनिसमधून निवृत्तीची घोषणा

**आणि**

- यंदाचा साहित्यातला नोबेल पुरस्कार दक्षिण कोरियाच्या लेखिका हान कांग यांना जाहीर

**<><><><><>**

ज्येष्ठ उद्योगपती, टाटा सन्सचे मानद अध्यक्ष आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी वरळी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी उपस्थित होते. टाटा यांचं काल रात्री मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झालं होतं. ते ८६ वर्षांचे होते.

आज सकाळी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी एनसीपीए इथं ठेवण्यात आलं होतं. राजकीय, औद्योगिक आणि इतर क्षेत्रांमधल्या नेते, तसंच विविध देशांचे राजदूत यांनी रतन टाटा यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं. रतन टाटा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, यांच्यासह इतर नेते,

उद्योजक, अभिनेते, खेळाडू, तसंच देश-विदेशातल्या मान्यवरांनी दुःख व्यक्त करत, त्यांना आदरांजली वाहिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले…

**होल्ड- बाईट - मुख्यमंत्री**

रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही मंत्रीमंडळानं संमत केला.

**<><><><><>**

ऐकूया रतन टाटा यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा संक्षिप्त आलेख…

***व्हाइस कास्ट***

*न्यूयॉर्कमधल्या कॉर्नेल विद्यापीठातून आर्किटेक्चरमधली पदवी पूर्ण केल्यानंतर १९६२ मध्ये रतन नवल टाटा, टाटा समुहात रूजू झाले. त्यानंतर १९७५ त्यांनी हॉवर्ड बिझनेस स्कूलमधून व्यवस्थापन विषयातलं शिक्षण पूर्ण केलं. टाटा समुहातल्या अनेक कंपन्यांमध्ये काम केल्यावर १९७१मध्ये National Radio & Electronics Company Limited कंपनीचं प्रभारी संचालकपद दिलं गेलं. १९८१ मध्ये ते टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्ष झाले. १९९१ पासून २८ डिसेंबर २०१२ पर्यंत ते टाटा सन्सचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात समुहाचा महसूल कित्येक पटीनं वाढला आणि २०११-१२ मध्ये १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे गेला. रतन टाटा यांच्याच नेतृत्त्वाखाली टाटा मोटर्सनं प्रवासी वाहन क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर नॅनो ही गाडी बाजारात आणली आणि जग्वार लँड रोव्हर ही ब्रिटीश कंपनी विकत केली. रतन टाटा यांच्या मार्गदर्शनात टाटा स्टीलनं कोरस, टाटा समुहानं VSNL, टाटा टी नं टेटली हा ब्रिटीश समूह अधिग्रहित केला. २०२१ मध्ये एअर इंडियाच्या बोलीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर रतन टाटा यांना खूपच आनंद*

*झाला होता. जेआरडी टाटा आज आपल्यात असते तर त्यांचा आनंद गगनात मावला नसता, अशी प्रतिक्रिया रतन टाटा यांनी दिली होती. सेवानिवृत्तीनंतर रतन टाटा यांना टाटा सन्ससह इतर अनेक कंपन्यांचं मानद अध्यक्षपद दिलं गेलं होतं. टाटा समुहातल्या इतर सदस्यांप्रमाणे, त्यांनीही सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिलं. शिक्षण, आरोग्य यासारख्या क्षेत्रातल्या त्यांच्या कामाचा कोट्यवधी लोकांच्या आयुष्यावर दीर्घ परिणाम दिसून येतो आहे. प्राणी, विशेषतः भटके कुत्रे आणि मांजरांची त्यांना विशेष काळजी होती. नुकतचं त्यांनी टाटा ट्रस्टकडून मुंबईत प्राण्यांसाठीचं रुग्णालय सुरू केलं होतं. वातावरण बदलासाठी कार्यरत असलेल्या इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्हचे ते संस्थापक होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मुंबईकरांना मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. केंद्र सरकारनं २००८ मध्ये त्यांना पद्मविभुषण देऊन गौरवलं होतं. गेल्याच वर्षी राज्य सरकारनं पहिला उद्योग रत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला होता.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून जीवन भावसार*

**<><><><><>**

भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणामुळे आसियान देशांमधल्या परस्पर संबंधांना नवी ऊर्जा, गती आणि दिशा दिली आहे, २१ वं शतक हे भारत आणि आसियान देशांचं शतक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. लाओस मधल्या व्हिएंतियान इथं भारत-आसियान शिखर परिषदेला ते संबोधित करत होते.

भारत आणि आसियान देशांमधले संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी यावेळी दहा कलमी कार्यक्रम जाहीर केला. पुढचं वर्ष आसियान-भारत पर्यटन वर्ष म्हणून साजरा होणार असून यासाठी भारत पाच दशलक्ष अमेरिकन डॉलर देणार आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. आसियान- भारत

विज्ञान महिला शास्त्रज्ञ विकास निधी अंतर्गत आसियान - भारत महिला शास्त्रज्ञ परिषदेचं आयोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी व्हिएंतियान इथं पोहोचल्यानंतर लाओसचे गृहमंत्री विलाव्योंग बौद्धखम यांनी स्वागत केलं. तसंच भारतीय वंशाच्या नागरिकांनीही प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. त्यानंतर स्थानिक कलाकारांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासमोर लाओ रामायण म्हणजे फलक फलम सादर केलं. त्यानंतर सेंट्रल बुद्धिस्ट फेलोशिप ऑर्गनायजेशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री सहभागी झाले होते.

प्रधानमंत्र्यांनी आज या परिषदेला आलेल्या आसियान देशांच्या नेत्यांशी द्विपक्षीय बैठका घेतल्या. जपानचे नवनियुक्त प्रधानमंत्री शिगेरु इशिबा आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन यांच्याशी झालेल्या बैठकांमधे उभय देशांमधलं सहकार्य आणखी मजबूत करण्याबाबत चर्चा झाली.

**<><><><><>**

**<u>जॉईंट स्टेटमेंट</u>**

शिक्षण, आरोग्य, कृषी आणि हवामान या क्षेत्रांमध्ये डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा वापर करण्यासंदर्भात सहकार्य करण्यावर भर देण्यात येईल, असं भारत आणि आसियान देशांच्या संयुक्त निवेदनात सांगण्यात आलं. डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी सर्व देशांनी आपसांत माहिती, अनुभव यांचं आदानप्रदान केलं जाईल, असं या निवदेनात म्हटलं आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे नोकरीचं स्वरुप बदलत असून कर्मचाऱ्यांना उच्च कौशल्य विकसित करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

**<><><><><>**

राज्य सरकारनं शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी, लोहार, नाथपंथीय समाज, पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी महामंडळं स्थापन करण्याचा निर्णय घेतला

आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज आयोजित बैठकीत हा निर्णय झाला.

अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळणाघरं सुरू करणं, तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता, कायमस्वरुपी विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालय स्थापन करायला मान्यता, जमिन तुकडेबंदी कायद्यात सुधारणा, राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा, तसंच जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापतींच्या निवडणुकीला मुदतवाढ द्यायला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

स्पेनचा सुप्रसिद्ध टेनिस खेळाडू आणि २२ ग्रँड स्लॅम्सचा विजेता राफेल नदाल याने आज व्यावसायिक टेनिस मधून आपल्या निवृत्तीची घोषणा केली आहे. समाजमाध्यमांवर पोस्ट केलेल्या एका चित्रफितीत त्याने ही घोषणा केली असून आपल्या कारकिर्दीत क्रीडा रसिकांकडून मिळालेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. मालागा इथं येत्या नोव्हेंबरमध्ये होणारी डेविस चषक स्पर्धा नादालची शेवटची स्पर्धा असेल.

नादालने त्याच्या टेनिस कारकिर्दीत ९२ एटीपी एकेरी अजिंक्यपदे आणि ३६ मास्टर्स विजेतेपदं जिंकली आहेत. शिवाय सर्व चार एकेरी ग्रँड स्लॅम विजेतेपदं आणि ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणारा तो जगातला एकमेव टेनिसपटू आहे.

**<><><><><>**

यंदाचा साहित्यातला नोबेल पुरस्कार दक्षिण कोरियाच्या प्रसिद्ध लेखिका हान कांग यांना जाहीर झाला आहे. कांग यांच्या काव्यात्मक गद्यसाहित्य प्रकारातल्या लेखनासाठी त्यांना हा पुरस्कार देत असल्याचं स्विडीश पुरस्कार समितीनं जाहीर केलं आहे. मानवी जीवन, त्यातली असुरक्षितता, वेदना, आयुष्यावर होणारे आघात यांचं प्रभावी वर्णन या साहित्यप्रकारात कांग यांनी केलं आहे.

<><><><><>

हिज्ब-उत-तहरीर तसंच तिच्याशी संबंधित सर्व आघाड्या आणि संघटनांना केंद्र सरकारनं दहशतवादी संघटना घोषित केलं आहे. हिज्ब-उत-तहरीर कर्मठवाद आणि तरुणांना दहशतवादी संघटनांमधे सामील होण्यासाठी प्रेरित करण्याच्या, तसंच दहशतवादी कारवायांसाठी निधी उभारण्याच्या प्रयत्नांमधे गुंतली असल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. लोकशाही मार्गानं निवडून आलेली सरकारं जिहाद आणि दहशतवादी कारवायांच्या माध्यमातून उलथून पाडणं आणि ईस्लामी राज्य स्थापन करणं हे या संघटनेचं उद्दिष्ट आहे, असं गृहमंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

देशाच्या व्यापार आकडेवारीनुसार तयार कपड्यांच्या उत्पादनात वार्षिक ११ टक्के वाढ होत असून भारतातील वस्त्रोद्योग क्षेत्रात २०३० साला पर्यंत साडेतीनशे बिलियन डॉलर्स  पर्यंत वाढ होईल असा अंदाज केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने व्यक्त केला आहे. पी एम मित्र आणि उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेमार्फत या  क्षेत्रात येत्या ३ वर्षांत ९० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग मोहिमेसारख्या अनेक योजनांमुळे भारताला वस्त्रोद्योग क्षेत्रात जागतिक स्तरावर अग्रस्थानी  पोचण्यात मदत मिळेल असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

आकाशवाणी मुंबईमध्ये आज स्वास्थ की पाठशाला या कार्यक्रमाद्वारा आरोग्य सुदृढ राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आलं.

योग्य झोप, पोषक आहार, पाणी आणि संतुलित व्यायाम आणि तणावाचे व्यवस्थापन करण्याचे मार्गदर्शन आरोग्यविषयक मार्गदर्शक रोहित शिंदे आणि पूजा शिंदे यांनी केलं.

आहाराद्वारा आपले पचनाचे आरोग्य सुधारण्याकडे लक्ष दिले तर आपले शरीर लवकर थकत नाही आणि प्रदीर्घकाळ कार्यरत राहते असं रोहित शिंदे म्हणाले.

**<><><><><>**